**कृपया प्रसिध्दीसाठी** **5 ऑक्टोबर 2011**

## तारापूर प्रकल्पग्रस्त मच्छिमारांना
## किना-यालगतची जमीन देण्यास सरकार तयार

**मुंबई,बुधवार:** न्यायालयीन रेट्यामुळे अखेर तारापूर अणु ऊर्जा प्रकल्पामुळे बाधित मच्छिमारांना मासेमारीसाठी किना-यालगतच सहा हेक्टर जमीन वापरु देण्यास काल महाराष्ट्र सरकारने तयारी दाखविली आहे. तारापूर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्तीद्वय श्री.बी.एच. मर्लापल्ले व श्री. पी.डी.कोदे यांच्या खंडपीठापुढे प्रतिज्ञापत्राद्वारे काल सरकारने ही तयारी दर्शविली असल्याची माहिती, खटल्यात हस्तक्षेप करुन सहभागी झालेले माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी दिली.

तारापूर अणु ऊर्जा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबतची रिट याचिका 2004 सालापासून न्यायप्रविष्ट आहे. प्रकल्पग्रस्तांपैकी जे मच्छिमार आहेत त्यांचे राहण्यासाठी घरे देऊन पुनर्वसन समुद्रकिना-यापासून 7 किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर त्यांना मच्छिमारासाठी किना-यालगत जागा दिली नाही. त्यामुळे या मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचाच प्रश्न निर्माण झाला. गेली सात वर्षे वारंवार चर्चा करुनही ही समस्या न सुटल्याने श्री. राम नाईक व प्रकल्पग्रस्त मच्छिमारांनी ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणली होती. त्यामुळे मच्छिमारांना मासेमारीसाठी चांगल्या सुविधा, बोटी नांगरण्यासाठी व इतर मासेमारीच्या साधनांसाठी किना-यालगतची जमीन देण्यासंबंधी विचारविनिमय करावा असा आदेश उच्च न्यायालयाने 8 सप्टेंबर रोजी राज्य सरकारला दिला होता. त्यानंतर काल सुनावणीच्यावेळी राज्य सरकारने समुद्र किना-यावरची सहा हेक्टर जमीन देण्याची तयारी दाखविली.

राज्य सरकारच्या महसूल विभागाच्या सहसचिवांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की महसूल व वन खात्याने 4 फेब्रुवारी 1983 रोजी काढलेल्या शासकीय निर्णयानुसार मच्छिमारांना मासेमारीसाठी किना-यालगतची सरकारी जमीन वापरु देण्यासंबंधीचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार वापरण्यासाठी जागा उपलब्ध असल्यास ठाणे जिल्हाधिकारी निर्णय घेऊ शकतात. उनभाट येथे जागा उपलब्ध असल्याची माहिती ठाणे जिल्हाधिका-यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे दिली आहे.

न्यायालयापुढे ही दोन्ही प्रतिज्ञापत्रे आली त्यावेळी उनभाट येथील काही स्थानिकांचा सरकारच्या या प्रस्तावाला विरोध असल्याचेही ॲड. के.एन.कोरे यांनी न्यायालयाच्या निदर्शनाला आणले. त्यामुळे मूळ स्थानिक व प्रकल्पग्रस्त यांच्या सामंजस्याने हा प्रश्न सोडविता येईल काय हे बघण्यासाठी खंडपीठाने उभय पक्षांना मुदत दिली असून पुढील सुनावणीची तारीख 19 ऑक्टोबर राहील असे सांगितले. या सुनावणीच्यावेळी श्री. राम नाईक यांनी स्वतः बाजू मांडली, तर ॲड. के. एन.कोरे यांनी उनभाटच्या ग्रामस्थांची बाजू मांडली. याशिवाय राज्य सरकारच्यावतीने ॲड. नितीन देशपांडे, प्रकल्पग्रस्तांच्यावतीने ॲड.राजीव पाटील आणि न्युक्लीअर पॉवर कॉर्पोरेशनच्यावतीने ॲड. लोपा मुनीम सुनावणीच्या वेळी हजर होते.

**(कार्यालय सचिव)**